0 5 FEB 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ६७२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. बुधवारी विविध ८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १३ परीक्षा केंद्रांवर पार पडल्या. या परीक्षांसाठी ११३० विद्यार्थी उपस्थित होते. दिवसभरात ७ अभ्यासक्रमांचे निकाल लागले, तर एकूण ६७२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत.

0 5 FEB 2026

तरूण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या ६६५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर


**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील मंगळवारी चार अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. आजअखेर ६६५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. मंगळवारी दोन अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध पाच परीक्षा केंद्रावर झाल्या असून परीक्षांसाठी ४७ विद्यार्थी उपस्थित होते.

परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन करण्यात आली होती. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्याकडून करण्यात आले आहे.

04 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात हुतात्मा दिन



कोल्हापूर : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज शिवाजी विद्यापीठात हुतात्मा दिन पाळण्यात येऊन दोन मिनिटे मौन राखून अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीच्या प्रांगणात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह अधिकारी आणि प्रशासकीय सेवकांनी सकाळी ठीक ११ वाजता दोन मिनिटे स्तब्धता पाळून महात्मा गांधी यांच्यासह हुतात्म्यांना अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, संगणक केंद्राचे संचालक अभिजीत रेडेकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यापीठाच्या सर्व अधिविभागांत आणि प्रशासकीय विभागांमध्येही सर्व अधिविभाग प्रमुखांसह शिक्षक, सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी आपापल्या जागेवर उभे राहून हुतात्म्यांना अभिवादन केले.

05 FEB 2026
पुढारी

# नेमबाजी स्पर्धेत समिक्षा पाटीलला सुवर्णपदक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



मेरठ (उत्तर प्रदेश) येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये कोल्हापुरातील वेध ॲकॅडमीची खेळाडू समिक्षा सुभाष पाटील हिने सुवर्णपदकाची कमाई केली.

शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना समिक्षाने १० मीटर एअर रायफल प्रकारात ६३१.२ गुण मिळवत कॉलिफिकेशन राऊंडमध्ये पहिल्या क्रमांकासह वैयक्तिक सुवर्णपदक मिळवले. तिची निवड खेलो इंडिया राष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता झाली आहे. समिक्षा रामानंदनगर- जरगनगर येथील वेध रायफल व पिस्तल शूटिंग ॲकॅडमीमध्ये सराव करत असून, कोपार्डे येथील स. ब. खाडे महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. तिला आंतरराष्ट्रीय नेमबाज व शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त प्रशिक्षक सौ. राधिका बराले - हवालदार व रोहित हवालदार, प्रा. डॉ. अभिजित वाणिरे, शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

0 3 FEB 2026

क्रांतीसिंह

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात हुतात्मा दिन साजरा



कोल्हापूर(प्रतिनिधी):–राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज शिवाजी विद्यापीठात हुतात्मा दिन पाळण्यात येऊन दोन मिनिटे मौन राखून अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीच्या प्रांगणात प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह अधिकारी आणि प्रशासकीय सेवकांनी सकाळी ठीक ११ वाजता दोन मिनिटे स्तब्धता पाळून महात्मा गांधी यांच्यासह हुतात्म्यांना अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, संगणक केंद्राचे संचालक अभिजीत रेडेकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यापीठाच्या सर्व अधिविभागांत आणि प्रशासकीय विभागांमध्येही सर्व अधिविभाग प्रमुखांसह शिक्षक, सेवक आणि विद्यार्थी–विद्यार्थिनी यांनी आपापल्या जागेवर उभे राहून हुतात्म्यांना अभिवादन केले.

0 5 FEB 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नेमबाज समीक्षा पाटीलचा सुवर्णवेध



**कोल्हापूर :** अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना कोल्हापूरच्या समीक्षा सुभाष पाटील हिने सुवर्णपदक प्राप्त केले. ती वेध ॲकॅडमीची खेळाडू आहे. मेरठ (उत्तर प्रदेश) येथे या स्पर्धा सुरू आहेत.

समीक्षा हिने १० मी. एअर रायफल प्रकारात ६३१.२ गुण मिळवत क्वॉलिफिकेशन राऊंडमध्ये पहिला क्रमांक मिळवला व वैयक्तिक सुवर्णपदक मिळवले. यामुळे तिची खेलो इंडिया राष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात आंतरराष्ट्रीय खेळाडू राधिका बराले हिच्यानंतर अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण मिळवणारी समीक्षा ही दुसरी महिला खेळाडू आहे. ती वेध रायफल व पिस्तूल शूटिंग ॲकॅडमीमध्ये सराव करत असून, कोपार्डे येथील स. ब. खाडे महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. तिला आंतरराष्ट्रीय नेमबाज व शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त प्रशिक्षक राधिका बराले-हवालदार व रोहित हवालदार यांचे मार्गदर्शन, तर प्रा. डॉ. अभिजित वणिरे, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

0 5 FEB 2026

तरुण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

# शिवाजी विद्यापीठात अर्थसंकल्पावर परिसंवाद

**कोल्हापूर :** केंद्रीय अर्थसंकल्पावर विशेष परिसंवाद विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादात डॉ. आण्णासाहेब पाटील यांनी अर्थसंकल्पात ग्रामीण भारत, पायाभूत सुविधा व संरक्षण क्षेत्रासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. शिक्षण, कौशल्य विकास व तंत्रज्ञानाच्या विकासासाठी आणखी लक्ष देण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांबळे यांनी आर्थिक सर्वेक्षण, संवैधानिक तरतुदी व भारताची जागतिक अर्थव्यवस्थेतील स्थितीच्या तरतुदींचा आढावा घेतला. डॉ. केदार मारुलकर यांनी अर्थसंकल्पामधील प्राप्तीकरविषयक तरतुदी व अर्थसंकल्पाचा शेअर बाजारावर होणारा परिणामाबद्दल विवेचन केले. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी अर्थसंकल्पाच्या अपेक्षा व प्रत्यक्ष तरतुदींचा आढावा घेतला. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी प्रास्ताविक केले. हरीष कांबळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

05 FEB 2026

पुढारी

# कोल्हापुरात दारकरी कोळ्याच्या नव्या प्रजातीचा लागला शोध!

## अधिवासामधील फेरबदलांमुळे प्रजाती नष्ट होण्याचा धोका

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ, शेंडा पार्क आणि पुईखडीच्या टेकडीवरून दारकरी कोळ्याच्या नवीन प्रजातीचा शोध लागला आहे. याबाबतचा संशोधन प्रबंध 'जर्नल ऑफ नॅचरल हिस्ट्री' या युनायटेड किंग्डममधून प्रकाशित होणाऱ्या आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकामधून नुकताच प्रकाशित झाला. संशोधनात ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशन आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरमधील संशोधकांचा सहभाग आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागातील संशोधक सत्पाल गंगलमाले यांच्या पीएचडी संशोधनाचा हा भाग असून प्रा. डॉ. सुनील गायकवाड हे त्यांचे मार्गदर्शक आहेत. यात ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशनचे संशोधक तेजस ठाकरे व अक्षय खांडेकर यांचा सहभाग आहे. कोळ्यांचा एक गट त्यांच्या बिळांना दरवाजा बनवण्यासाठी प्रसिद्ध आहे. 'ट्रॅपडोअर स्पायडर' या सामान्य इंग्रजी नावाने त्यांना ओळखले आते. बिळांना दार करण्याच्या त्यांच्या लकबीवरून त्यांना 'दारकरी' हे मराठी नाव देण्यात आले आहे. नव्याने शोधलेल्या प्रजातीमधील कोळ्यांच्या दातांची रचना आणि आठ डोळ्यांच्या मांडणीवरून त्यांचा समावेश 'टाईटनइडिओप्स' या कुळात करण्यात आला आहे. कोल्हापूर शहरामधील त्यांच्या आढळक्षेत्रावरून त्यांना 'टाईटनइडिओप्स कोल्हापूरईन्सिस' असे नाव देण्यात आले आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ, शेंडा पार्क आणि पुईखडीच्या टेकडी परिसरातील दारकरी कोळ्याची मादी व नर.**

### दारकरी कोळ्याची वैशिष्ट्ये

कोल्हापूरचा दारकरी कोळी गवताळ माळांच्या सपाट पृष्ठभागावर उभ्या किंवा उतारावरील जमिनीवर तिरकी बिळे करतो. बिळांच्या सुरुवातीला बनवलेले दरवाजे बाहेरच्या बाजूने भोवतालाशी तंतोतंत मिसळलेले असतात. त्यामुळे दरवाजा बंद असतो तेव्हा या कोळ्यांचे अस्तित्व कळून येत नाही. भोवतालात मिसळलेला दरवाजा हा त्यांच्या भक्ष्यांसाठी लावलेला सापळा असतो. भक्ष्य टप्प्यात आले की, हे कोळी क्षणार्धात त्यांना पकडतात आणि आत खेचून नेतात. तसेच हे दरवाजे कोळ्यांना त्यांच्या भक्षकांपासून संरक्षण पुरवतात. आयुष्याचा बहुतेक काळ हे कोळी आपल्या बिळांमधे लपून किंवा दबा धरून बसलेले असतात. रातकिड्यांसारखे छोटे कीटक हे त्यांचे खाद्य आहे.

"

कोल्हापूर शहरातील नैसर्गिक गवताळ माळरानांवरील फेरबदल, विकासकामे आणि त्यांवर केली जाणारी विदेशी वृक्षांची लागवड थांबवली नाही, तर कोल्हापूरच्या दारकरी कोळ्याची प्रजाती स्थानिक पातळीवरून नष्ट होण्याचा धोका आहे.

**- सत्पाल गंगलमाले (संशोधक)**

05 FEB 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात हिंदी विभागातर्फे राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** डिजीटल युगात तंत्रज्ञानाचा उपयोग अनिवार्य असला तरी त्याचा मर्यादित वापर केला पाहिजे. गरजेपेक्षा अधिक तंत्रज्ञानाचा उपयोग माणसाला भावनाशून्य बनवितो. तंत्रज्ञानापेक्षा मानवी जीवनामध्ये भावना आणि संवेदनांना खूप महत्त्व आहे, असे मत मुंबई येथील 'फोर्स वन"चे पोलीस अधीक्षक तथा प्रशिक्षक गजानन राजमाने यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागात 'पीएम उषा' सॉफ्ट कॉम्पॉनंट योजनेअंतर्गत आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. 'भाषा प्रयोग एवं अध्यापन में आयसीटी" विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी मार्गदर्शन केले. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी तंत्रज्ञानाचा आढावा घेतला.

डॉ. सुषमा चौगले, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. अक्षय भोसले व डॉ. जयसिंग कांबळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. गीता दोडमणी यांनी सूत्रसंचालन केले. प्रतीक्षा ठुबरे यांनी आभार मानले. यावेळी आसाम येथील प्रागज्योतिष महाविद्यालयाच्या डॉ. नंदिता राजबंशी, डॉ. सातप्पा सावंत, डॉ. राजाराम गुरव, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. अनिल मकर, डॉ. प्रकाश निकम आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 4 FEB 2026 आरंभ २ व्हथ्यू

# विद्यापीठस्तरीय रँकिंगमध्ये रसायनशास्त्र, अर्थशास्त्र अधिविभाग सर्वोत्कृष्ट

कोल्हापूर : अधिविभागांच्या शैक्षणिक आणि संशोधकीय कामगिरीवरच समग्र विद्यापीठाच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जाते. शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागांनी 'विद्यापीठ अधिविभागीय रँकिंग फ्रेमवर्क'मध्ये चांगल्या कामगिरीचे प्रदर्शन केले असून यापुढील काळात ही कामगिरी सातत्याने उंचावत राहण्यासाठी विभागांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी केले.



महाराष्ट्र शासनाने, राज्यातील अकृषि सार्वजनिक विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठांतील विविध अधिविभागांकडून संशोधनाला चालना देणे, उपलब्ध संसाधनांचा पुरेपुर कार्यक्षम वापर करणे, कार्यपद्धतीत पारदर्शकता आणणे आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे यासाठी विद्यापीठांतर्गत विभागांना मानांकन देण्याचा उपक्रम दरवर्षी राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या समितीमार्फत सर्व अधिविभाग, अध्यासने आणि केंद्र यांची १० व ११ डिसेंबर २०२५ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी करण्यात आली होती.

विद्यापीठामध्ये राबविण्यात आलेल्या या अधिविभागनिहाय क्रमवारी मानांकनामध्ये (यू.डी.आर.एफ.) रसायनशास्त्र अधिविभाग आणि अर्थशास्त्र अधिविभाग यांनी सर्वोत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले.

सदर उपक्रमांतर्गत विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा आणि मानवविज्ञान, वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा यांच्याअंतर्गत प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या अधिविभागांना अनुक्रमे रुपये दहा लाख व पाच लाख आणि अध्यासने आणि केंद्रांच्या गटामध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्यांना अनुक्रमे रुपये दोन लाख व एक लाख तसेच प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह अशा पारितोषिकांनी गौरविण्यात आले.

यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत रसायानशास्त्र अधिविभागाने प्रथम, तर नॅनो विज्ञान आणि बायोटेक्नोलॉजी अधिविभागाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. इतर विद्याशाखांच्या गटात अर्थशास्त्र अधिविभागाने प्रथम आणि शिक्षणशास्त्र अधिविभागाने द्वितीय क्रमांक मिळविला. अध्यासने व केंद्र या गटामध्ये विद्यापीठ वैज्ञानिक उपकरण केंद्राने (युसिक) प्रथम आणि शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

**'समाजोपयोगी संशोधनावर रसायनशास्त्र अधिविभागाचा भर'**

रसायनशास्त्र अधिविभागाने संशोधनाच्या माध्यमातून समाजोपयोगी व औद्योगिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण कार्यावर विभागाने सातत्याने भर दिला आहे. गेल्या पाच वर्षांत रसायनशास्त्र विभागाला संशोधनासाठी एक कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी प्राप्त झाला. या निधीच्या माध्यमातून स्मार्ट व प्रकाशोत्सर्जक पदार्थ, कॅन्सरवरील संशोधन, ऊर्जा साठवणुकीसाठी सुपर कॅपेसिटर बॅटरी, विविध प्रकारचे सेन्सर तसेच औद्योगिक वापरासाठी उपयुक्त रसायनांच्या निर्मितीवर महत्त्वपूर्ण संशोधन करण्यात आले.

विभागाने एकूण ४० समाजोपयोगी पेटंट्स प्राप्त केली असून त्यामध्ये भारतीय, जर्मन तसेच युनायटेड किंगडम (यूके) येथील पेटंट्सचा समावेश आहे.

0 5 FEB 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दारकरी कोळ्याच्या नव्या प्रजातीचा शोध

## कोल्हापूर शहरात नोंद; सत्पाल गंगलमाले यांचे संशोधन

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठ, शेंडा पार्क आणि पुईखडीच्या टेकडीवरून दारकरी कोळ्याच्या नवीन प्रजातीच्या शोधाचा निबंध 'जर्नल ऑफ नॅचरल हिस्ट्री' या युनायटेड किंगडममधून प्रकाशित होणाऱ्या आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकेमधून आज प्रकाशित झाला. या संशोधनात ठाकरे वाईल्डलाईफ फाउंडेशन आणि शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांचा सहभाग आहे.**

हे संशोधन सत्पाल गंगलमाले यांच्या शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागामधून सुरू असलेल्या पीएच.डी. संशोधनाचा भाग आहे. त्यांना प्रा. डॉ. सुनील गायकवाड यांचे मार्गदर्शन मिळाले. यात ठाकरे वाईल्डलाईफ फाउंडेशनचे संशोधक तेजस ठाकरे आणि अक्षय खांडेकर यांचा सहभाग आहे.

'ट्रॅपडोअर स्पायडर' या सामान्य इंग्रजी नावाने त्यांना ओळखले आते. बिळांना दार करण्याच्या त्यांच्या लकबीवरून त्यांना 'दारकरी' हे मराठी नाव दिले आहे. नव्याने शोधलेल्या प्रजातीमधील कोळ्यांच्या दातांची रचना आणि आठ डोळ्यांच्या मांडणीवरून त्यांचा समावेश 'टाईटनइडिओप्स' या कुळात केला आहे. शहरामधील त्यांच्या आढळ क्षेत्रावरून त्यांना 'टाईटनइडिओप्स कोल्हापूरईन्सिस' असे नाव दिले आहे. कोल्हापूरच्या या दारकरी कोळ्याची नोंद शिवाजी विद्यापीठ, शेंडा पार्क, कोल्हापूर चित्रनगरी परिसर आणि पुईखडीच्या टेकडीवरून केली आहे.

### दृष्टिक्षेपात

- नवीन प्रजातींचे कोळी कोल्हापूरच्या नैसर्गिक माळरानांवर आढळतात.
- 'उंदीरमारी'सारख्या विदेशी वृक्षांच्या भागात या कोळ्यांचे अस्तित्व नाही.
- माळराने आता बांधकाम शेतीसाठी वापरल्यामुळे या कोळ्यांचा निवारा धोक्यात.
- अभ्यास क्षेत्राच्या आसपासच्या ३० किलोमीटर परिघात अजूनही अनुकूल अधिवास.

0 5 FEB 2026

सकाळ



# असा असतो दारकरी कोळी

कोल्हापूरचा दारकरी कोळी गवताळ माळांच्या सपाट पृष्ठभागावर उभी किंवा उतारावरील जमिनीवर तिरकी बिळे करतो. बिळांच्या सुरुवातीला बनवलेले दरवाजे बाहेरच्या बाजूने भोवतालाशी तंतोतंत मिसळलेले असतात. त्यामुळे दरवाजा बंद असतो, तेव्हा या कोळ्यांचे अस्तित्व कळून येत नाही. भोवतालात मिसळलेला दरवाजा हा त्यांच्या भक्ष्यांसाठी लावलेला सापळा असतो. भक्ष टप्प्यात आले की हे कोळी त्यांना पकडतात आणि आत खेचून नेतात. हे दरवाजे कोळ्यांना त्यांच्या भक्षकांपासून संरक्षण पुरवतात. बहुतेक काळ हे कोळी बिळांत लपून किंवा दबा धरून बसलेले असतात. रातकिड्यांसारखे छोटे कीटक हे त्यांचे खाद्य आहे. जर माळरानांवरील मानवी हस्तक्षेप, विदेशी वृक्षलागवड आणि विकासकामे थांबवली नाहीत, तर 'कोल्हापुरी दारकरी कोळी' नष्ट होण्याचा धोका संशोधकांनी नोंदवला आहे.

0 5 FEB 2026


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवतंत्रज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राकडे भारताची नवी वाटचाल

## राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात व्याख्यानाचे आयोजन

**जनप्रवास : कोल्हापूर**

यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात देशाने विज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राकडे लक्ष केंद्रित केल्याचे स्पष्ट होत असून, संगणक क्षेत्राच्या पुढे जाऊन आता नव्या तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन उद्योग विकसित होण्याच्या दिशेने भारताच्या विज्ञान क्षेत्राची वाटचाल सुरू आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रकाश पवार यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या नेहरू अभ्यास केंद्रातर्फे आज 'प्रा. नरहर विष्णू कारेकर व्याख्यानमाले' अंतर्गत डॉ. प्रकाश पवार यांचे 'भारताचे विज्ञान धोरण' या विषयावर बुधवारी व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या नेहरू अभ्यास केंद्रातर्फे 'प्रा. नरहर विष्णू कारेकर व्याख्यानमाले' अंतर्गत भारताचे विज्ञान धोरण' या विषयावर बोलताना डॉ. प्रकाश पवार, सोबत मान्यवर.

भारताच्या विज्ञान धोरणाचा व्यापक आढावा घेताना डॉ. प्रकाश पवार म्हणाले, यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पातून देशाच्या विकासाचा नवा टप्पा अधोरेखित झाला आहे. विज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राला पुन्हा प्राधान्य देत भारत आता संगणक व सेवा क्षेत्रांच्या पुढे जाऊन नव्या तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन उद्योगांच्या उभारणीकडे वळत असल्याचे दिसते आहे. जागतिकीकरणानंतर जुन्या ज्ञानव्यवस्थेच्या जागी नव्या तंत्रज्ञानाधारित ज्ञाननिर्मिती सुरू झाली असून औद्योगिक क्रांतीपासून संगणकीकरण, डिजिटल तंत्रज्ञान यांच्या मार्गे आता कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंतचा हा प्रवास भारताच्या विज्ञान क्षेत्राला नवे परिमाण प्राप्त करून देत आहे.

डॉ. पवार यांनी भारताच्या विज्ञान धोरणाचा ऐतिहासिक प्रवास स्वातंत्र्यपूर्वकालीन आधुनिकतावादाचा काळ, स्वातंत्र्योत्तर काळातील वैज्ञानिक संस्थांची उभारणी आणि १९९० नंतरच्या जागतिकीकरणोत्तर तंत्रज्ञानप्रधान युगाचा कालखंड असा तीन टप्प्यांत मांडला. ते म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा फुले, लोकहितवादी आणि न्यायमूर्ती रानडे यांनी स्वीकारलेला आधुनिकतावादी दृष्टिकोन हा वैज्ञानिक विचारांचा पाया ठरला. स्वातंत्र्योत्तर काळात पंडित नेहरू यांच्या दूरदृष्टीमुळे आयआयटी, भाभा अणुऊर्जा संशोधन केंद्र, एन. पी. एल., एन. सी. एल. यांसारख्या शैक्षणिक व वैज्ञानिक संस्थांची उभारणी झाली आणि भारतात विज्ञानवादाची मजबूत पायाभरणी झाली. १९५१ मध्ये खरगपूर येथे पहिली आयआयटी स्थापन झाल्यानंतर मुंबई, कानपूर, दिल्ली आदी ठिकाणी या संस्था उभारण्यात आल्या. त्या काळात ३,७०३ संशोधक प्राध्यापक म्हणून कार्यरत होते आणि ५९,९६५ विद्यार्थी या संस्थांत शिक्षण घेत होते. एका नव्या आधुनिक पर्वाची नांदी ठरणारा असा हा कालखंड होता. भारताच्या भावी वैज्ञानिक विकासाची पायाभरणी या पर्वाने केल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी स्वागत, प्रास्ताविक आणि परिचय करून दिला. मयुरेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर आकाश ब्राह्मणे यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. सुखदेव उंदरे, भारत शास्त्री, डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भारतीय ज्ञानपरंपरेचा साकल्याने वेध

अध्यक्षीय मनोगतात अधिष्ठाता डॉ. देशमुख म्हणाले, विज्ञान आणि मानव्यविज्ञानामधील परस्परसंबंध हा फार महत्त्वपूर्ण आहे. भारताच्या वैज्ञानिक वाटचालीविषयी बोलत असताना डॉ. पवार यांनी भारतीय ज्ञानपरंपरेचा अत्यंत साकल्याने वेध घेतला आहे.

0 5 FEB 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरच्या माळरानात सापडला 'दारकरी कोळी'

## सत्पाल गंगलमाले यांनी शोधली नवी प्रजात; अधिवास धोक्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूर शहरातील नैसर्गिक माळरानांमध्ये दारकरी कोळ्याच्या (ट्रॅपडोअर स्पायडर) एका नव्या प्रजातीचा शोध लागला आहे. अधिवासांमध्ये होत असलेल्या मानवनिर्मित बदलांमुळे ही प्रजाती स्थानिक पातळीवर नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचा इशारा संशोधकांनी दिला आहे.

कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठ परिसर, शेंडा पार्क, कोल्हापूर चित्रनगरी परिसर त्याचबरोबर पुईखडीच्या टेकडीवर आढळलेल्या या नव्या प्रजातीवरील संशोधन निबंध बुधवारी 'जर्नल ऑफ नॅचरल हिस्ट्री' या युनायटेड किंग्डममधून प्रकाशित होणाऱ्या आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकात प्रसिद्ध झाला. ठाकरे वाइल्डलाइफ फाउंडेशन आणि शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी संयुक्तपणे हे संशोधन केले आहे.

हे संशोधन शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागातील संशोधक सत्पाल गंगलमाले यांच्या पीएच.डी. अभ्यासाचा भाग आहे. प्रा.डॉ. सुनील गायकवाड हे त्यांचे मार्गदर्शक आहेत. ठाकरे वाइल्डलाइफ फाउंडेशनचे संशोधक तेजस ठाकरे तसेच अक्षय खांडेकर यांचा या अभ्यासात सहभाग आहे.


ट्रॅपडोअर स्पायडर नर


ट्रॅपडोअर स्पायडर मादी

### कोल्हापूरचे दिले नाव

बिळांना दारासारखी रचना करून दबा धरून भक्ष्य पकडणाऱ्या या कोळ्यांना इंग्रजीत 'ट्रॅपडोअर स्पायडर', तर मराठीत 'दारकरी कोळी' म्हणून ओळखले जाते. आठ डोळ्यांच्या मांडणीआधारे या प्रजातीचा समावेश 'टायटन-इडिओप्स' वंशात केला असून, कोल्हापुरातील आढळावरून तिला 'टायटनइडिओप्स कोल्हापूरएन्सिस' असे नाव दिले आहे.

### नामशेष होण्याचा धोका

शहरालगत माळरानांचा अधिवास सध्या बांधकामे, शेती आणि वृक्षलागवडीमुळे झपाट्याने बदलत असून, हे बदल थांबविले नाहीत तर दारकरी कोळ्याची ही प्रजाती स्थानिक पातळीवर नामशेष होण्याचा गंभीर धोका असल्याचा इशारा संशोधकांनी दिला आहे.

### विदेशी वृक्ष घातक

संशोधनादरम्यान नैसर्गिक माळरानांवर या कोळ्यांची मोठ्या प्रमाणात नोंद झाली. मात्र उंदीरमारीसारख्या विदेशी वृक्षांची लागवड केलेल्या भागात या प्रजातीचे कोणतेही अस्तित्व आढळले नाही.

### रातकिडे, छोटे कीटक खाद्य

हा दारकरी कोळी गवताळ माळरानांवरील सपाट किंवा उताराच्या जमिनीत उभी अथवा तिरकी बिळे करतो. बिळाच्या तोंडाशी असलेले दरवाजे भोवतालच्या मातीशी पूर्णपणे मिसळलेले असल्याने ते सहज ओळखून येत नाहीत. रातकिडे व छोटे कीटक हे त्यांचे प्रमुख खाद्य आहे.

05 FEB 2026
तरुण भारत

# 'एआय'चा प्रवास विज्ञान क्षेत्र विकसित करणारा


प्रतिनिधी
कोल्हापूर

औद्योगिक क्रांतीपासून संगणकीकरण, डिजिटल तंत्रज्ञान यांच्या मार्गे आता कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंतचा हा प्रवास भारताच्या विज्ञान क्षेत्राला नवे परिमाण प्राप्त करून देत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या नेहरू अभ्यास केंद्रातर्फे 'प्रा. नरहर विष्णू कारेकर व्याख्यानात ते बोलत होते. 'भारताचे विज्ञान धोरण" या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते.

डॉ. प्रकाश पवार म्हणाले, यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पातून देशाच्या विकासाचा नवा टप्पा अधोरेखित झाला आहे. विज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राला पुन्हा प्राधान्य देत भारत आता संगणक व सेवा क्षेत्राच्या पुढे जाऊन नव्या तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन उद्योगांच्या उभारणीकडे वळत असल्याचे दिसत आहे.

पंडित नेहरू यांच्या दूरदृष्टीमुळे आयआयटी, भाभा अणुऊर्जा संशोधन केंद्र, एन.पी.एल., एन.सी.एल. यांसारख्या संस्थांची उभारणी झाली आणि भारतात विज्ञानवादाची मजबूत पायाभरणी झाली. अधिष्ठाता डॉ. देशमुख म्हणाले, विज्ञान आणि मानव्यविज्ञानामधील परस्परसंबंध हा फार महत्त्वपूर्ण आहे. सर्वसामान्यांचे राहणीमान उंचावणे हे विज्ञानाचे उद्दिष्ट असते. यावेळी नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. मयुरेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. आकाश ब्राह्मणे यांनी आभार मानले. डॉ. सुखदेव उंदरे, भारत शास्त्री, डॉ. आलोक जत्राटकर ी उपस्थित होते.




- डॉ. प्रकाश पोवार

- भारताच्या विज्ञान धोरणावर मार्गदर्शन

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 5 FEB 2026
सकाळ

# नवतंत्रज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राकडे भारताची नवी वाटचाल

## डॉ. प्रकाश पवार : विद्यापीठातील नेहरू अभ्यास केंद्राची व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात देशाने विज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राकडे लक्ष केंद्रित केल्याचे स्पष्ट होत आहे. संगणक क्षेत्राच्या पुढे जाऊन आता नव्या तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन उद्योग विकसित होण्याच्या दिशेने भारताच्या विज्ञान क्षेत्राची वाटचाल सुरू आहे, असे प्रतिपादन डॉ. प्रकाश पवार यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या नेहरू अभ्यास केंद्रातर्फे 'प्रा. नरहर विष्णू कारेकर व्याख्यानमाले'अंतर्गत डॉ. पवार यांचे 'भारताचे विज्ञान धोरण' या विषयावर व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते. भारताच्या विज्ञान धोरणाचा व्यापक आढावा डॉ. पवार यांनी घेतला. जागतिकीकरणानंतर जुन्या ज्ञानव्यवस्थेच्या जागी नव्या तंत्रज्ञानाधारित ज्ञाननिर्मिती सुरू झाली असून, औद्योगिक क्रांतीपासून संगणकीकरण, डिजिटल तंत्रज्ञान यांच्या मार्गे आता कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंतचा हा प्रवास भारताच्या विज्ञान क्षेत्राला नवे परिमाण प्राप्त करून देत असल्याचे त्यांनी सांगितले. भारताच्या विज्ञान धोरणाचा ऐतिहासिक प्रवास स्वातंत्र्यपूर्वकालीन आधुनिकतावादाचा काळ, स्वातंत्र्योत्तर काळातील वैज्ञानिक संस्थांची उभारणी आणि १९९० नंतरच्या जागतिकीकरणोत्तर तंत्रज्ञानप्रधान युगाचा कालखंड असा तीन टप्प्यांत त्यांनी मांडला.

नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुखदेव उंदरे, भारत शास्त्री, डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते. मयुरेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. आकाश ब्राह्मणे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : प्रा. नरहर विष्णू कारेकर व्याख्यानमालेत बोलताना डॉ. प्रकाश पवार.

### तिहेरी संगमातूनच विकसित भारताची उभारणी

सर्वसामान्य माणसाचे राहणीमान उंचावणे हे विज्ञानाचे उद्दिष्ट असते. त्यादृष्टीने जास्त लोकसंख्या असलेल्या देशाचा प्राधान्यक्रम रोजगारनिर्मिती असतो. अशा स्वावलंबी मनुष्यबळाच्या विकासामधूनच देशाची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल सुकर होणार आहे. तंत्रज्ञान, विज्ञान आणि मानव्यविज्ञान या तिहेरी संगमातूनच विकसित भारताची उभारणी होईल, असे डॉ. देशमुख यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 5 FEB 2026
पुण्यनगरी

# नवतंत्रज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राकडे भारताची नवी वाटचाल

## –डॉ. प्रकाश पवार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात देशाने विज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राकडे लक्ष केंद्रित केल्याचे स्पष्ट होत असून, संगणक क्षेत्राच्या पुढे जाऊन आता नव्या तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन उद्योग विकसित होण्याच्या दिशेने भारताच्या विज्ञान क्षेत्राची वाटचाल सुरू आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या नेहरू अभ्यास केंद्रातर्फे बुधवारी 'प्रा. नरहर विष्णू कारेकर व्याख्यानमाला' अंतर्गत 'भारताचे विज्ञान धोरण' या विषयावर व्याख्यानात डॉ. पवार बोलत होते. डॉ. पवार म्हणाले, यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पातून देशाच्या विकासाचा नवा टप्पा अधोरेखित झाला आहे. जागतिकीकरणानंतर जुन्या ज्ञानव्यवस्थेच्या जागी नव्या तंत्रज्ञानाधारित ज्ञाननिर्मिती सुरू झाली असून, औद्योगिक क्रांतीपासून संगणकीकरण, डिजिटल तंत्रज्ञान यांच्यामार्गे आता कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंतचा हा प्रवास भारताच्या विज्ञान क्षेत्राला नवे परिमाण प्राप्त करून देत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा फुले, लोकहितवादी आणि न्यायमूर्ती रानडे यांनी स्वीकारलेला आधुनिकतावादी दृष्टिकोन हा वैज्ञानिक विचारांचा पाया ठरला. स्वातंत्र्योत्तर काळात पंडित नेहरू यांच्या दूरदृष्टीमुळे आयआयटी, भाभा अणुऊर्जा संशोधन केंद्र, एन.पी.एल., एन.सी.एल. यासारख्या शैक्षणिक व वैज्ञानिक संस्थांची उभारणी झाली आणि भारतात विज्ञानवादाची मजबूत पायाभरणी झाली. १९५१ मध्ये खरगपूर येथे पहिली आयआयटी स्थापन झाल्यानंतर मुंबई, कानपूर, दिल्ली आदी ठिकाणी या संस्था उभारण्यात आल्या. त्या काळात ३,७०३ संशोधक प्राध्यापक म्हणून कार्यरत होते आणि ५९,९६५ विद्यार्थी या संस्थांत शिक्षण घेत होते. अध्यक्षीय मनोगतात मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख म्हणाले, सर्वसामान्य माणसाचे राहणीमान उंचावणे हे विज्ञानाचे उद्दिष्ट असते. तंत्रज्ञान, विज्ञान आणि मानव्यविज्ञान या तिहेरी संगमातूनच विकसित भारताची उभारणी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. मयुरेश पाटील यांनी सूत्रसंचालन, तर आकाश ब्राह्मणे यांनी आभार मानले.



व्याख्यानमालेत बोलताना डॉ. प्रकाश पवार.